**ठळक बातम्या**

- २०३० पर्यंत व्यापार ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्यावर भारत आणि कॅनडा यांच्यात सहमती

- दहशतवाद आणि कट्टरतावाद मानवतेसाठी घातक असल्याची भारतासोबतच कॅनडाची भूमिका असल्याचं प्रधानमंत्री नरेंद मोदी यांचं प्रतिपादन

- अमेरिकेसोबत चर्चा करायला इराणचा नकार, अमेरिका आणि इस्राइलकडून हल्ले तीव्र

- पश्चिम आशियातल्या युद्धामुळं शेअर बाजारात मोठी घसरण, सोनं, चांदी आणि कच्च्या तेलाचे दर वधारले

आणि

- टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेच्या उपांत्यफेरीत गुरुवारी भारताचा सामना इंग्लंडसोबत

**<><><><><>**

भारत आणि कॅनडा यांच्यातला व्यापार २०३० पर्यंत ५० अब्ज डॉलरपर्यंत वाढवण्याचा निर्णय दोन्ही देशांनी घेतला आहे. दोन्ही देशांमधला सर्वंकष व्यापार करार पूर्ण करण्यावरही सहमती झाल्याची माहिती प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी दिली आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री मार्क कार्नी यांच्यासोबत नवी दिल्लीत चर्चा केल्यावर ते वार्ताहरांना संबोधित करत होते.

दोन्ही देशातल्या व्यापार करारामुळं दोन्ही देशांमध्ये गुंतवणूक आणि रोजगाराच्या संधी वाढतील असं प्रधानमंत्री म्हणाले. भारत आणि कॅनडा संरक्षण संवाद स्थापन करण्यावर दोन्ही देशांमध्ये सहमती झाली. तसंच यावर्षी संयुक्तपणे नवीकरणीय ऊर्जा परिषद आयोजित केली जाणार आहे. दुर्मिळ खनिजं, नवीकरणीय ऊर्जेचा अधिकाधिक वापर आणि सांस्कृतिक भागिदारी वाढवण्यावर दोन्ही देशांनी सामंजस्य करार केले. दोन्ही देशांमधली विविध विद्यापीठांमध्येही याप्रसंगी विविध करार झाले. दहशतवाद आणि कट्टरतावाद मानवतेसाठी घातक असल्यावर दोन्ही देशांमध्ये एकमत असल्याचं प्रधानमंत्री मोदी यावेळी म्हणाले.

द्विपक्षीय संबंधांमध्ये झालेल्या प्रगतीचा दोन्ही नेत्यांनी चर्चेदरम्यान आढावा घेतला. व्यापार आणि गुंतवणूक, ऊर्जा, दुर्मिळ खनिजं, कृषी, शिक्षण, संशोधन आणि नवोन्मेष यासारख्या क्षेत्रातल्या दोन्ही देशांच्या संबंधांवरही यावेळी चर्चा झाली. जागतिक आणि प्रादेशिक परिस्थितीवरही दोन्ही नेत्यांनी मत व्यक्त केली. यानंतर दोन्ही नेते भारत आणि कॅनडातल्या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटणार आहेत.

परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनीही सकाळी कार्नी यांची भेट घेतली होती.

**<><><><><>**

अमेरिकेसोबत वाटाघाटी करायला इराणने स्पष्ट शब्दात नकार दिला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चर्चेची तयारी दाखवली होती. त्यावर इराणचे लष्करी अधिकारी अली लारिजानी यांनी ही प्रतिक्रिया दिली आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

- **- होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(अमेरिका आणि इस्रायलने इराणवरचे हल्ले अधिक तीव्र केले. यात इराणच्या अनेक युद्धनौका तसंच बॅलिस्टिक क्षेपणास्त्र तळ नष्ट झाले. अमेरिका आणि इस्रायलच्या भेदक माऱ्यामुळे इराणमधल्या अनेक इमारती नष्ट झाल्या असून धुराचे लोट आकाशात झेपावत होते. अमेरिकेच्या हल्ल्यात इराणच्या इस्लामिक रिव्हॉलिशनरी गार्ड कॉर्प्सचं मुख्यालय उद्ध्वस्त झालं आहे. याशिवाय नौदलाचे ९ जहाजं नष्ट झाली आहेत. बाकीचे जहाजही लवकरच नष्ट केले जातील असा इशारा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला आहे. हिजबोल्ला इराणच्या मदतीला धावून आली असून आपण इस्रायलवर प्रतिहल्ले केल्याचं त्यांच्या प्रतिनिधींनी म्हटलं आहे. त्यानंतर इस्रायलने लेबननवर केलेल्या हवाई हल्ल्यात ३१ जणांचा मृत्यू झाला.*

*अयातुल्ला खामेनी यांच्या मृत्यूनंतर इराणनेही प्रतिहल्ले करत इस्रायल आणि अरब देशांवर क्षेपणास्त्रं डागली आहेत. इराणने केलेल्या प्रतिहल्ल्यात अमेरिकेचे तीन सैनिक ठार झाले असून पाच जण जखमी झाले आहेत. संयुक्त अरब अमिरातीने तेहरानमधला आपला दूतावास बंद करण्याची घोषणा केली आहे. इराणने कुवेत आणि संयुक्त अरब अमिरातीवर केलेल्या हल्ल्याचा यूएईने तीव्र निषेध केला आहे. दुसरीकडे इराणने आपल्या महत्त्वाच्या तळावर हल्ले केल्यामुळे इराणला प्रत्युत्तर दिलं जाईल, असा इशारा आखाती देशांनी दिला*

*आहे. तर इराणचे इतर देशांवरचे हल्ले थांबवण्यासाठी युरोपियन देशांनी अमेरिकेला मदतीचा हात दिला आहे. ब्रिटन, फ्रान्स आणि जर्मनीने इराणच्या क्षेपणास्त्र हल्ल्याचा निषेध केला आहे. तिन्ही युरोपीय देशांनी अमेरिका आणि इस्रायलला सहकार्य करण्याचा निर्णय घेतला असून ब्रिटनच्या लष्करी तळाचा वापर करायची परवानगी अमेरिकेला दिल्याचं ब्रिटनचे प्रधानमंत्री कीर स्टार्मर यांनी सांगितलं.*

*दरम्यान, अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा निषेध करण्यासाठी पाकिस्तानमधे मोठ्या प्रमाणात निदर्शनं झाली. कराचीमधल्या अमेरिकेच्या वाणिज्य दूतावासावर आंदोलकांनी हल्ला करण्याचा प्रयत्न केल्यामुळे पोलिसांनी केलेल्या गोळीबारात दहा जणांचा मृत्यू झाला. पाकिस्तानचे गृहमंत्री मोहसीन नक्वी यांनी नागरिकांना शांततेचं आवाहन केलं आहे. पाकिस्तानमधे अनेक ठिकाणी नागरिक आंदोलन करत आहेत.)*

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने सर्व राज्यांना पत्र पाठवून सावधगिरी बाळगण्याचं आवाहन केलं आहे. इराणच्या बाजूने बोलणाऱ्या कट्टरपंथी लोकांची ओळख पटवायला केंद्रीय गृहमंत्रालयाने सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना सांगितलं आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कठोर कारवाईची गरज यात व्यक्त करण्यात आली आहे. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**- - - होल्ड व्हाइस कास्ट - - -**

*(पश्चिम आशियातल्या युद्धजन्य परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल मंत्रिमंडळ सुरक्षा समितीची बैठक झाली. या प्रदेशातल्या भारतीय समुदायाच्या सुरक्षिततेबद्दल या बैठकीत गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली. भारतीय समुदायाला मदत करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश मंत्रिमंडळ सुरक्षा समितीने संबंधित विभागांना दिले आहेत.*

*प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामीन नेत्यान्याहू आणि संयुक्त अरब अमिरातीच्या नेत्यांशी चर्चा केली. तसंच संघर्ष थांबवण्यात यावा, अशी इच्छा व्यक्त केली.*

*संघर्षाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडियाने संयुक्त अरब अमिराती, सौदी अरेबिया, इस्रायल आणि कतारसाठी जाणारी आणि येणारी विमान उड्डाणं रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे.*

*याशिवाय युरोपला जाणारी काही निवडक उड्डाणंही रद्द करण्यात आली आहेत. युरोप आणि अमेरिकेला जाणारी विमानं पश्चिम आशियाच्या हवाई क्षेत्रातून न जाता पर्यायी मार्गांचा अवलंब करणार आहेत.*

*जम्मू काश्मिरमधल्या सुरक्षेचा आढावा घेण्यासाठी नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांनी काल बैठक घेतली. शांतता कायम राखणं हे आपलं प्राधान्य असून नागरिकांनी याचं पालन करावं असं आवाहन त्यांनी केलं.*

*सध्या इराणमधे वास्तव्याला असलेल्या जम्मू काश्मीरच्या विद्यार्थ्यांची सुरक्षितता सुनिश्चित करण्यासाठी राज्य सरकार परराष्ट्र व्यवहार मंत्रालय, केंद्र सरकार यांच्या सतत संपर्कात आहे, असं मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांगितलं. त्यांनी नागरिकांना शांततेचं आवाहन केलं.*

*दरम्यान, पश्चिम आशियातल्या संघर्षामुळे दुबईमधे अडकून पडलेली भारतीय बॅडमिंटनपटू पी व्ही सिंधू उद्यापासून सुरू होणाऱ्या ऑल इंग्लंड चॅम्पीयनशीपला मुकणार आहे. सिंधुला सुरक्षित जागी हलवण्यात आलं आहे.)*

**<><><><><>**

मध्य पूर्वेत सुरू असलेल्या युद्धामुळं जगभरातल्या शेअर बाजारात आज घसरण दिसून आली. देशातले शेअर बाजार मोठ्या घसरणीसह सुरू झाले. व्यवहार सुरू झाले तेव्हा काही क्षण सेन्सेक्स २ हजार ७०० आणि निफ्टी ५०० हून अधिक अंकांनी घसरले होते. त्यानंतर बाजार सावरले होते पण नंतर पुन्हा त्यात घसरण वाढत गेली. सध्या सेन्सेक्स सुमारे १ हजार ६०० अंकांनी घसरुन ७९ हजार ७०० च्या जवळ व्यवहार करतो आहे. तर निफ्टी सुमारे ५०० अंकांनी घसरुन २४ हजार ७०० च्या आसपास व्यवहार सुरू आहे.

युद्धामुळं सोनं आणि चांदीच्या दरातही आज चांगली वाढ दिसून आली. २४ कॅरेट एक तोळा सोन्याचे दर १ लाख ७१ हजारांच्या पलीकडे तर २२ कॅरेट एक तोळा सोन्याचे दर १ लाख ६७ हजारांच्या पलीकडे गेले होते. एक किलो चांदीसाठी २ लाख ९५ हजार रुपये मोजावे लागत होते. भारतीय कमोडिटी बाजारात कच्चा तेलाचे दर प्रति बॅरल ५०० रुपयांनी वधारुन ५ हजार ६९६ रुपये प्रति बॅरल या सार्वकालिक उच्चांकी पातळीवर पोहोचले आहेत.

या युद्धामुळं कच्च्या तेलाचं उत्खनन एप्रिलमध्ये दिवसाला २ लाख ६ हजार बॅरेलनं वाढवण्याचा निर्णय ओपेक प्लस समुहातल्या देशांनी घेतला आहे.

**<><><><><>**

पाकिस्तानातल्या अनेक लष्करी ठिकाणांवर हल्ला केल्याचं अफगाणिस्तानातल्या संरक्षण मंत्रालयानं जाहीर केलं आहे. रावळपिडींतला नूर खान हवाई तळ, क्वेट्टा आणि खैबर पख्तुनवामधला सैन्याचा तळ यांचा यात समावेश आहे. काबुल आणि बगराममध्ये पाकिस्तानी लष्करानं केलेल्या हल्ल्याच्या प्रत्युत्तरादाखल हे हल्ले केल्याचं अफगाणिस्ताननं म्हटलं आहे. यात पाकिस्तानच्या ३२ सैनिकांचा मृत्यू झाल्याचा दावा अफगाणिस्ताननं केला आहे.

**<><><><><>**

अमेरिकेतल्या टेक्सास राज्यातल्या ऑस्टीनमधल्या एका बारमध्ये झालेल्या गोळीबारात तिघांचा मृत्यू झाला आणि १४ जण जखमी झाले. पोलिसांनी केलेल्या गोळीबारात हल्लेखोराचाही मृत्यू झाला.

**<><><><><>**

ज्येष्ठ नेते, माजी खासदार, माजी कुलगुरू, साहित्यिक आणि थोर विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांचं आज सकाळी साडेआठ वाजता लातूरमध्ये निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. काही दिवसांपूर्वी पॅरालिसिसचा झटका आल्यामुळं त्यांच्यावर घरगुती उपचार सुरू होते. त्यांच्या पार्थिवावर औसा तालुक्यातल्या कवठा या त्यांच्या मूळ गावी उद्या सकाळी ११ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<><><><><>**

टी–ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत भारत उपान्त्य फेरीत दाखल झाला आहे. उपांत्य फेरीत भारताचा सामना इंग्लड बरोबर होईल. मुंबईतल्या वानखेडे मैदानावर गुरुवारी संध्याकाळी ७ वाजता हा सामना होणार आहे. या स्पर्धेत उपान्त्य फेरीचा पहिला सामना चार मार्चला दक्षिण आफ्रिका आणि न्यूझीलंड यांच्यात होणार आहे.

काल कोलकाता इथं झालेल्या सामन्यात भारताने वेस्ट इंडिजचा पाच गडी राखून पराभव केला. वेस्ट इंडिजच्या संघाने प्रथम फलंदाजीकरत चार बाद १९६ धावा केल्या. प्रत्युत्तरादाखल आलेल्या भारतीय संघाने चार चेंडू शिल्लक असताना हे लक्ष्य साध्य केलं. नाबाद ९७ धावा करणारा संजू सॅमसन सामनावीर पुरस्काराचा मानकरी ठरला.

**//<><><><><>//**